# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 04.06.2025** **वार- बुधवार**

---

**<u>पालखीतयारी</u>**

पिंपरी चिंचवड शहरात जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचं १९ जून तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचं पिंपरी चिंचवड हद्दीमध्ये २० जूनला आगमन होणार असून, त्याच दिवशी पालख्या पुण्याच्या दिशेने मार्गस्थ होणार आहेत. या दोन्ही सोहळ्याच्या स्वागताची महापालिकेकडून सुरू असलेली तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी पालखीच्या मुक्कामाच्या ठिकाणाची आणि वारकरी भवनाच्या नियोजित ठिकाणांची पाहणी करून आढावा घेतला.

**<u>पालखीआरोग्यविभाग</u>**

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्गांवरील आरोग्य सज्जतेचा आढावा आज आरोग्य विभागाकडून घेण्यात आला. आरोग्य यंत्रणांच्या तयारीसह औषधांची उपलब्धता आणि पालखी मार्गांवरील पाणी स्त्रोतांची तपासणी यावर पुणे आरोग्य विभागाने भर दिला आहे. पालखी मार्गांवरीवल टँकर भरणा केंद्रे आणि पाणी स्त्रोतांची तपासणी तसंच हॉटेल आणि हॉटेलमधील कामगारांची तपासणी करण्याचे निर्देश या आढावा बैठकीत देण्यात आले.

**<u>शालेयवाहन-आरटीओ’ तपासणी</u>**

नवीन शैक्षणिक वर्षानुसार शाळांना लवकरच सुरुवात होण्यापूर्वी  शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांच्या वाहनांची योग्यता तपासणी करण्यात येणार आहे. उपप्रादेशिक परिवहन विभाग अर्थात आरटीओने या वाहनांचं 'योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण' करण्याबाबत  आदेश काढले आहेत. विद्यार्थ्यांची वाहतूक सुरक्षित व्हावी यासाठी शालेय वाहनांची तपासणी करून योग्यता प्रमाणपत्र अद्ययावत असणे बंधनकारक करण्यात आलं आहे.

**<u>पर्यावरणदिन</u>**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने 'सिटी व्हिजनिंग वर्कशॉप' कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत महिला बचत गट आणि प्लास्टिक कचरा व्यवस्थापन करणाऱ्या संस्थांनी 'शहरस्तरीय प्लास्टिक पुनर्वापर' या विषयावर चर्चा केली. शहरातील बचत गटांच्या महिलांना अशा उपक्रमाच्या माध्यमातून हाताला काम मिळवून देण्याचा प्रयत्न महापालिका करत असल्याचे पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी सांगितले.

**<u>रक्तदान</u>**

येत्या बकरी ईदनिमित्त मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या वतीने राज्यस्तरीय रक्तदान अभियान सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. याच बरोबर, अवयव दान आणि मरणोत्तर देहदान अभियानही राबवण्यात येणार आहे अशी माहिती मंडळातर्फे देण्यात आली आहे.

**<u>शिवशकराजदंड</u>**

येत्या 6 जून रोजी, शिवराज्याभिषेक दिनानिमित्त एस एस पी एम एस महाविद्यालयाच्या प्रांगणात शिवरायांचे पूर्ण कृती अश्वारूढ स्मारक आणि भगव्या स्वराज्यध्वजासह 51 फूट उंच शिवशक राजदंड स्वराज्यगुढी उभारण्यात येणार आहे, अशी माहिती शिवजयंती महोत्सव समितीचे संस्थापक अमित गायकवाड यांनी दिली.

**नाट्यगृहनियम**

पुणे शहरातील नाट्यगृहांमध्ये  खाद्यपदार्थ नेण्यास बंदी असल्याच्या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय पुणे महापालिकेच्या सांस्कृतिक विभागाच्या बैठकीत घेण्यात आला. कोथरूड इथल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात नुकताच रात्री नाटकाचा प्रयोग सुरू असताना एका महिला प्रेक्षकाला उंदराचा त्रास झाला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या सांस्कृतिक विभागामार्फत विविध विभागांसह नाट्य कलाकार आणि नाट्य व्यवस्थापकांची संयुक्त बैठक झाली. नाटकाचा प्रयोग सुरू होण्याआधी आणि संपल्यानंतर नाट्यगृहाची स्वच्छता आणि उंदरांचा उपद्रव कमी करण्यासाठी आवश्यक त्या  उपाययोजना करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

**एकतानगरनिधी**

नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावरील एकतानगरी इथं पुन्हा पाणी घुसू नये, यासाठी नदीकाठी  सीमाभिंत बांधण्यासाठी राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडं ३०० कोटी रुपये निधीची मागणी करण्यात आली आहे अशी माहिती पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी आज पत्रकारांना दिली.  गेल्या वर्षी झालेली अतिवृष्टी आणि मध्यरात्री धरणातून अचानक मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग झाल्यामुळे  एकता नगरीमधील नागरिकांचा जीव धोक्यात आला होता.

**सचिनपिळगावकर**

कोणतेही कर्मकांड न करता ज्यांचा स्वतःवर अतूट विश्वास आहे, तेच खरे आस्तिक असतात, असं  मत अभिनेते सचिन पिळगावकर यांनी व्यक्त केलं. 'विल्सन' या दुर्मिळ आजाराशी आत्मविश्वासाच्या जोरावर यशस्वी झुंज देऊन छायाचित्रकार म्हणून आपला ठसा उमटवणारे अक्षय परांजपे यांच्या जीवनावर त्यांचे

वडील संतोष परांजपे यांनी लिहिलेल्या 'अक्की' या पुस्तकाचं प्रकाशन पिळगावकर यांच्या हस्ते काल पुण्यात करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

**<u>हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल २६ आणि किमान २२ पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली. आज सकाळपासून शहर आणि परिसरात पावसाच्या जोरदार ते हलक्या स्वरूपाचा पाउस पडत आहे. उद्या देखील हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाउस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतासह, नमस्कार.**